महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2140/2024-25 दिनांक -23/08/2024

# JEE/NEET परीक्षांकरीता तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तक संच वाटप योजनेअंतर्गत नोंदणी अर्ज

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, भटक्या जाती - विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन 2024-25 मध्ये JEE/NEET परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरीता तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाज्योती मार्फत पुस्तक संच वाटप करण्यासाठी इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

❖ **एकूण लाभार्थी संख्या- 8000 (4000 संख्या JEE करीता व 4000 संख्या NEET करीता) (लाभार्थी संख्येच्या तुलनेत सामाजिक प्रवर्ग व समांतरआरक्षणाप्रमाणे तसेच इयत्ता 10 वी मध्ये प्राप्त गुणांकनानुसार लाभ देण्यात येईल.)**

**अ. योजनेच्या लाभासाठी पात्रता :-**

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील असावा/असावी तसेच विद्यार्थी नॉन-क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा/असावी.
3. सन - 2024 मध्ये 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सदर योजनेच्या लाभाकरीता पात्र राहतील.
4. विद्यार्थी हा विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेला असावा. या बाबतची कागदपत्रे स्पष्ट व दुष्य पद्धतीने जोडणे आवश्यक आहे.
5. विद्यार्थ्यांची निवड ही इयत्ता 10 वी च्या परीक्षेत प्राप्त टक्केवारी तसेच सामाजिक प्रवर्ग व समांतर आक्षणानुसार करण्यात येईल.
6. इयत्ता 10 वी मध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांकरीता 70% किंवा यापेक्षा जास्त तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरीता 60% किंवा यापेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे.
7. विद्यार्थी शहरी किंवा ग्रामीण भागातील आहे किंवा कसे हे विद्यार्थ्यांच्या आधारकार्ड वरील नमुद पत्त्यावरुन ठरविल्या जाईल.

**ब. अर्ज करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे :-**

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजुसहित)
2. रहिवासी दाखला (Domicile Certificate)
3. जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
5. 10 वी ची गुणपत्रिका
6. विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्याचा दाखला (बोनाफाईट सर्टिफिकेट)

7. दिव्यांग असल्यास दाखला
8. अनाथ असल्यास दाखला

**क. आरक्षण** :-

- **सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे** :-

| अ.क्र | सामाजिक प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | इतर मागास वर्ग (OBC) | 59 % |
| 2 | निरधीसुचती जमाती - अ (VJ-A) | 10% |
| 3 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 8% |
| 4 | भटक्या जमाती - क (NT-C) | 11% |
| 5 | भटक्या जमाती - ड (NT-D) | 6% |
| 6 | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | 6% |
| **एकूण** | | **100%** |

- **समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे** :-

1) प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.

2) दिव्यांगाकरीता 5% जागा आरक्षित आहे.

3) अनाथांसाठी 1% जागा आरक्षित आहे.

**ड. अर्ज कसा करावा** :-

1. महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"JEE/NEET परीक्षांकरीता तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तक संच वाटप योजना"** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत 'ब' मध्ये नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.

➢ **अटी व शर्ती** :-

1. अर्ज करण्याची अंतिम दि.15/09/2024 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे तसेच निवडीची पद्धती बदलणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या दरम्यान उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास विद्यार्थ्यांस सदर योजनेच्या लाभापासून वंचित करण्यात येईल.
5. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर संर्पक करावा : **संपर्क क्र** - 0712-2870120/21

   E-mail Id : mahajyotingp@gmail.com

(स्वा.)

(राजेश खवले)

व्यवस्थापकीय संचालक

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,

(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.